अविरत वाटचाल

बातमीचा वेध घेणारं नेटवर्क

दिवसभराच्या अपडेट्ससाठी aviratvaatchal.com

वर्ष ५ अंक ४२ RNI No. - MAHMAR/2016/69814 मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पनवेल, रायगड आणि उर्वरित महाराष्ट्र किंमत ३ रू. १५ सप्टेंबर २०२४ ते २१ सप्टेंबर २०२४

AVIRAT VAATCHAL NEWS www. avirat vaatchal.com AVIRAT VAATCHAL AVIRAT VAATCHAL Email : aviratvaatchalnews@gmail.com 9892438557

चोखंदळ आणि खात्रीशीर बातम्यांसाठी

आपलं विश्वासाचं न्यूज नेटवर्क

NEWS PAPER

YOUTUBE CHANNEL

अविरत वाटचाल

बातमीचा वेध घेणारं नेटवर्क

DIGITAL NEWS PORTAL

MAGAZINE

www.aviratvatchaal.com aviratvatchaal

aviratvatchaalnews aviratvatchaal

मोबाइल ई-पेपरसाठी संपर्क :- ९८९२४३८५५७

पश्चिम घाट पर्यावरण संवेदनशील क्षेत्र घोषित

रत्नागिरी जिल्ह्यातील ३११ गावांचा समावेश

केंद्र सरकारची प्रारुप अधिसूचना प्रसिध्द ■ ६० दिवसात मागवल्या हरकती, सूचना

अविरत वाटचाल न्यूज नेटवर्क

रत्नागिरी: भारत सरकार राजपत्र, पर्यावरण, वन व वातावरण बदल मंत्राल्य प्रारूप अधिसुचना दिनांक ३१ जुलै २०२४ अन्वये पश्चिम घाट पर्यावरण संवेदनशील (WESTERN GHAT ECO- SENSITIVE AREA) क्षेत्रासंबंधी प्रारूप अधिसुचना प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

या अधिसूचनेमध्ये चिपळूण तालुक्यातील ४४ गांवे, खेड तालुक्यातील ८५ गांवे, लांजा तालुक्यातील ५० गांवे, राजापूर तालुक्यातील ५१ गांवे आणि संगमेश्वर तालुक्यातील ८१ गांवाचा अशी एकूण ३११ गांवाचा समावेश करण्यात आला आहे. या अधिसूचनेस अंतिमस्वरूप प्राप्त होण्यापूर्वी प्रारूप अधिसूचनेत नमुद केलेल्या क्षेत्रातील (गांवातील) लोकप्रतिनिधी / स्थानिक रहिवासी यांना कोणत्याही प्रकाराच्या सूचना, हरकती /अगर तक्रार असल्यास, त्यांनी Environment Protection Act,, १९८६ आणि नियम १९८६ मधील तरतुदीनुसार त्यांचे सुचना, आक्षेप लेखी स्वरूपात ६० दिवसांच्या आत केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरण बदल मंत्रालय, इंदिरा पर्यावरण भवन, जोरबाग रोड, नवी दिल्ली– ११०००३ यांच्याकडे किंवा ई–मेल आयडीवर est-mel@nic.in नोंदविणे आवश्यक आहे.

भारत सरकार राजपत्र, पर्यावरण, वन व वातावरण बदल मंत्रालय प्रारूप अधिसुचना दिनांक ३१ जुलै २०२४ अन्वये पश्चिम घाट पर्यावरण संवेदनशील (WESTERN GHAT ECO- SENSITIVE AREA) क्षेत्रासंबंधी प्रारूप अधिसुचना प्रसिध्द करण्यात आलेली आहे. जिल्ह्यातील एकूण ३११ गावांचा या अधिसूचनेमध्ये समाविष्ट असून त्यांचा तालुकानिहाय तपशील पुढीलप्रमाणे-

चिपळून तालुका

चिपळूण तालुक्यातील आडरे, अकुशंखा नगर, आनारी, बामणोली, डेरवण, धाकमोली, दुर्गवाडी, दुर्गवाडी खुर्द, गाणे, **(पान २वर)**

NMMT बस अटल सेतू मार्गावरुन मंत्रालयापर्यंत धावणार

अविरत वाटचाल न्यूज नेटवर्क

नवी मुंबई: नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे अर्थात एनएमएमटीचे वातानुकूलित अतिजलद नवीन बसमार्ग क्र.११६ नेरुळ बस स्थानक (पूर्व) ते मंत्राल्य मार्गे उल्वे, शिवाजीनगर टोल नाका तसेच बसमार्ग क्र.११७ खारघर से.३५ ते मंत्राल्य मार्गे पनवेल, पळस्पे, गव्हाण टोल नाका अशी बससेवा अटल सेतू या मार्गावरुन १२ सप्टेंबरपासुन सुरु करण्यात आली आहे.

बस मार्ग क्रमांक ११६ : प्रवास कालावधी– ९५ ते १०० मिनिटे, दिवस : सोमवार ते शनिवार प्रवास भाडे : २३० रुपये प्रति प्रवासी

प्रवासमार्ग – नेरुळ बसस्थानक, सागरदिप सोसायटी / शुश्रूषा हॉस्पिटल, आगरी कोळी संस्कृती भवन, से.४२ ए बस स्थानक / गायमुख चौक, नमुंमपा मुख्याल्य, मोठा उलवा गाव, शगुन रियाल्टी चौक, बामणडोंगरी रेल्वे स्थानक, उल्वे प्रभात हाईट्स, शिवाजीनगर / अटल सेतू टोल नाका, शिवडी–न्हावासेवा अटल सेतू मार्गे शिवडी, डॉकयार्ड रोड रेल्वे स्थानक, वाडीबंदर, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल / जीपीओ, गोल्डनगेट / डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, एल.आय.सी. / मंत्राल्य डाऊन

प्रवास स्थानक

नेरुळ बसस्थानक ते मंत्राल्य : सकाळी ७.५५आणि मंत्राल्य ते खारकोपर रेल्वे स्थानक :सकाळी ९.४५,

खारकोपर रेल्वे स्थानक ते मंत्राल्य : सायंकाळी ५.२० आणि मंत्राल्य ते नेरुळ बस स्थानक : सायंकाळी ६.२५

बस मार्ग क्रमांक ११७ : प्रवास कालावधी– ११५ ते १०० मिनिटे, दिवस : सोमवार ते शनिवार, प्रवासभाडे : २७० रुपये प्रति प्रवासी

प्रवासमार्ग : खारघर से. ३५ सर्कल उत्सव चौक, स्पॅगेटी / घरकुल, कळंबोली सर्कल, आसुडगाव आगार, पनवेल एसटी बस स्थानक, भिंगारी, पळस्पेफाटा, महात्मा फुले विद्यालय / करंजाडे फाटा, गव्हाण टोलनाका, शिवडी – न्हावासेवा अटल सेतू मार्गे शिवडी, डॉकयार्ड रोड रेल्वे स्थानक, वाडीबंदर, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल / जीपीओ, गोल्डनगेट / बाबासाहेब आंबेडकर चौक, एल. आय. सी / मंत्राल्य (डाऊन),

प्रवास स्थानक

खारघर से.३५ ते मंत्राल्य : सकाळी ७.४०

मंत्राल्य ते खारघर से.३५ –सायंकाळी ६.१५

उत्सवांच्या काळात मिठाई व दुग्धजन्य पदार्थांमध्ये भेसळ रोखा

सर्व राज्यांना सतर्कतेचे आदेश

अविरत वाटचाल न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली: उत्सव काळादरम्यान मिठाई आणि दुग्धजन्य पदार्थांची वाढती मागणी लक्षात घेता, यात भेसळ होण्याच्या घटना वाढण्याची शक्यता असते. यामुळे ग्राहकांचे आरोग्य लक्षात घेता, अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणा ने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या अन्न सुरक्षा आयुक्तांना उत्पादन आणि विक्रीवर कठोर नजर ठेवण्याचे निर्देश दिले आहेत.

उत्सवांच्या काळात मिठाई, फरसाण, दूध आणि दुग्धजन्य उत्पादने जसे की तूप, खोवा आणि पनिर यांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढते.

fssai

Food Saftey and Standards Authority of India

या वाढलेल्या मागणीमुळे काही वेळा काही उत्पादक या वस्तूंमध्ये भेसळ करतात. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी एफएसएसएआय ने विशेष देखरेख आणि अंमलबजावणी मोहिमा राबविण्याचे निर्देश दिले आहेत.

ज्या बाजारपेठांमध्ये भेसळीच्या घटना घडण्याची शक्यता आहे, तिथे फूड सेफ्टी ऑन व्हिल्स युनिट्स तैनात करावेत, असे प्राधिकरणाचे निर्देश आहेत.

जिल्हा परिषदेचे बांधकाम विभागातील कामाचे लॉटरी पद्धतीने वाटप

महाराष्ट्रात पहिल्यांदाच जिल्हा परिषद ठाणे मार्फत पेमेंट गेटवेचा वापर

अविरत वाटचाल न्यूज नेटवर्क

ठाणे : जिल्हा परिषदेमार्फत सुशिक्षित बेरोजगार अभियंता मजूर कामगार सहकारी संस्था यांना बांधकाम विभागातील १० लाखाच्या आतील विकास काम विनास्पर्धा ऑनलाईन लॉटरी पद्धतीने बी. जे. हायस्कूल येथे १३ सप्टेंबर रोजी वाटप करण्यात आले. सन २०२४–२५ या वर्षातील १६६ विकास कामाचे वाटप ऑनलाईन लॉटरी पद्धतीने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे व अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रुपाली सातपुते यांच्या हस्ते वितरण करण्यात आले.

काम वाटप आणि आर्थिक व्यवहार पारदर्शकपणे करण्याच्या उद्देशाने कामकाज करण्यात आले आहे. पुढील कामवाटप नियोजन ऑनलाईन लॉटरी पद्धतीने फेसबुक, युट्यूब दूर-दृश्यप्रणाली द्वारे देखील (लाईव्ह) करण्यात येईल. विकास कामांना गती मिळण्यासाठी सुरूवात उत्तम झाली असून काम देखील उत्तम पद्धतीने व्हावी अशी अपेक्षा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी व्यक्त केली.

कामवाटप ऑनलाईन पद्धतीने राबवणारी महाराष्ट्रातील ७ वी जिल्हा परिषद असून पेमेंट गेटवे वापर करणारी महाराष्ट्रातील पहिली जिल्हा परिषद ठाणे आहे. तंत्रज्ञानाच्या वापरामुळे कामांना गती मिळणार असून लॉटरी पद्धतीने काम मिळालेल्या सर्वांचे अभिनंदन, असे प्रास्ताविक करताना अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रुपाली सातपुते **(पान २वर)**

गणपती उत्सवासाठी मध्य रेल्वे २२ विशेष रात्री लोकल चालवणार

अविरत वाटचाल न्यूज नेटवर्क

मुंबई: गणेश उत्सानिमित्त प्रवास करणाऱ्या भक्तांसाठी मध्य रेल्वेने १४ ते १८ सप्टेंबर या काळात २२ विशेष रात्री लोकल चालविण्याचा निर्णय घेतला आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई आणि कल्याण-ठाणे प्रवासासाठी तसेच हार्बर मार्गावर छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते पनवेल आणि परत गणपती विसर्जनाच्या दिवशी १७-१८ सप्टेंबररोजी मध्यरात्री या लोकल चालतील.

डाउन मेन लाइनवर (१४ ते १८ सप्टेंबर या काळात मध्यरात्री)

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस –कल्याण विशेष १ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथून मध्यरात्री १.४० वाजता सुटेल आणि कल्याण येथे पहाटे ३.१० वाजता पोहोचेल.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस –ठाणे विशेष १ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथून पहाटे २.३० वाजता सुटेल **(पान २वर)**

तळोजा येथे १७७ कोटींचे अंमली पदार्थ नष्ट

अविरत वाटचाल न्यूज नेटवर्क

मुंबई: केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमाशुल्क मंडळ (CBIC), मुंबई कस्टम्स झोन–१ आणि महसूल गुप्तचर संचालनालय (DRI) च्या ड्रग डिस्ट्रक्शन कमिटीने २४.७३ किलो नार्कोटिक ड्रग्ज आणि सायकोट्रॉपिक सबस्टन्स (NDPS) जाळून नष्ट केले. नवी मुंबई येथील तळोजा येथे १० सप्टेंबर रोजी मुंबई कचरा व्यवस्थापन लिमिटेडच्या सामायिक घातक कचरा प्रक्रिया साठवण आणि विल्हेवाट सुविधा (CHWTSDF) केंद्र येथे हेरॉईन, कोकेन आणि गांजा या अंमली पदार्थांसह, १७७ कोटी रुपये इतके अंदाजे बाजार मूल्य असलेले बेकायदेशीर पदार्थ नष्ट करण्यात आले. चालू आर्थिक वर्षातील अंमली पदार्थ नष्ट करण्याची ही अशा प्रकारची पहिलीच कारवाई आहे.

गेल्या आर्थिक वर्षात मुंबई कस्टम झोन–१ ने १,५२५ कोटी रुपये किंमतीचे २१५.२७ किलो ड्रग्ज नष्ट केले होते. पोस्टल मूल्यांकन विभाग (PAS) आणि मुंबई कस्टम झोन–१ च्या विशेष तपास आणि गुप्तचर शाखा (SIIB) यांनी महसूल गुप्तचर संचालनालयाच्या सहकार्याने हे अंमली पदार्थ जप्त केले.

‘बुद्धांच्या शिकवणीचा प्रसार करण्यासाठी महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती भूमिका बजावेल’

अविरत वाटचाल न्यूज नेटवर्क

मुंबई : बौद्ध धम्माच्या अनुयायांची मोठी संख्या असलेले महाराष्ट्र हे राज्य भगवान बुद्धांच्या शिकवणीचा देशभरात प्रसार करण्यामध्ये मध्यवर्ती भूमिका बजावेल, असे केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार आणि संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी सांगितले आहे. ‘बुद्धाचा मध्यम मार्ग–जागतिक नेतृत्वाचा मार्गदर्शक’ या विषयावर १४ सप्टेंबर रोजी मुंबईत नेहरू विज्ञान केंद्रात आयोजित केलेल्या एक दिवसाच्या परिषदेत ते बोलत होते. महाराष्ट्रात बौद्ध धम्माला बळकट केल्यामुळे देशभरात सकारात्मकता प्रतिबिंबित होईल, यावर रिजिजू यांनी भर दिला.

आंतरराष्ट्रीय बौद्ध महासंघाचे सरचिटणीस शार्त्से खेन्सूर जँगचूप चोडेन यांनी बुद्धांच्या शिकवणीबद्दल नितांत आदरभाव व्यक्त केला. अहिंसेच्या परिवर्तनकारी सामर्थ्यावर भर देत सरचिटणीस चोडेन यांनी या शिकवणीचा सखोल अभ्यास केल्याने दया आणि करुणाभावाची कशा प्रकारे जोपासना होते यावर प्रकाश टाकला. सध्याच्या काळात निर्माण झालेल्या जागतिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी केवळ बुद्धांची शिकवणच व्यवहार्य तोडगा देऊ शकतात असे देखील त्यांनी अधोरेखित केले.

भारत हा अनेक धर्म आणि पंथांचे जन्मस्थान कसा आहे आणि उर्वरित जगाचे लक्ष सत्ता संपादनावर असताना तो नेहमीच प्रेम आणि करुणेचा प्रचार करण्यासाठी कसा उभा ठाकला, यावर राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष इक्बाल सिंग लालपुरा यांनी प्रकाश टाकला.

डीआरडीओ आणि भारतीय नौदलाची VLSRSAM ची सलग दुसरी उड्डाण चाचणी यशस्वी

अविरत वाटचाल न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली: संरक्षण संशोधन आणि विकास संघटना (डीआरडीओ) आणि भारतीय नौदलाने, व्हर्टिकल लॉन्च शॉर्ट रेंज सरफेस टू एअर मिसाईल (VLSRSAM)च्या एकापाठोपाठ एक यशस्वी उड्डाण चाचण्या केल्या आहेत.

सलग दुसरी चाचणी १३ सप्टेंबर २०२४ रोजी ओदिशातील चंडीपूर स्थित एकात्मिक चाचणी तळ येथून घेण्यात आली. या क्षेपणास्त्राने अत्यंत कमी उंचीवरून उडणाऱ्या आणि रडारवर दिसू न येणाऱ्या अतिवेगवान हवाई लक्ष्यावर हल्ला केला आणि लक्ष्य निष्प्रभ करण्याची अचूकता आणि क्षमतेचे दर्शन घडवले.

१२ सप्टेंबर २०२४ रोजी पहिली चाचणी घेण्यात आली तेव्हाही VLSRSAM क्षेपणास्त्राने कमी उंचीवरील लक्ष्याचा भेद यशस्वीपणे पूर्ण केला.

सलग घेण्यात आलेल्या या चाचण्या केवळ शस्त्र प्रणालीची विश्वासार्हता दर्शवत नाहीत तर प्रणालीतील विविध घटकांमध्ये अलीकडील काळात करण्यात आलेल्या सुधारणा देखील प्रमाणित करतात.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी यशस्वी उड्डाण चाचण्यांसाठी डीआरडीओ, भारतीय नौदल आणि सर्व संबंधित चमूंचे कौतुक केले. ते म्हणाले की आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असलेल्या या क्षेपणास्त्रामुळे सशस्त्र दलांना तंत्रज्ञानाच्या बाबतीत आणखी चालना मिळेल.

संरक्षण संशोधन आणि विकास विभागाचे सचिव आणि डीआरडीओचे अध्यक्ष डॉ. समीर व्ही कामत यांनी देखील (VLSRSAM) प्रणालीच्या उड्डाण चाचण्यांमध्ये सहभागी चमूचे अभिनंदन केले.

ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेसाठी अर्ज करण्यास मुदतवाढ

अविरत वाटचाल न्यूज नेटवर्क

ठाणे : महाराष्ट्र शासनाने राज्यातील अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, अखिल भारतीय वैद्यकीय परिषद, भारतीय फार्मसी परिषद, वास्तुकला परिषद, राज्य शासन किंवा तत्सम संस्था इ. मार्फत मान्यताप्राप्त महाविद्यालयामध्ये व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक, पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या व वसतीगृहामध्ये मोफत प्रवेश मिळाला नसल्यास ''ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना'' सुरु करण्यात आली आहे. या योजनेसाठी मुदत वाढविण्यात आली असून उच्च शिक्षणाच्या द्वितीय, तृतीय व चतुर्थ वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी ऑफलाईन पध्दतीने अर्ज ३० सप्टेंबरपर्यंत तसेच प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी १५ ऑक्टोबर २०२४ पर्यंत दिली आहे.

ही योजना इतर मागासवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती (धनगर समाजाचे विद्यार्थी वगळून) आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना लागू आहे. या योजनेमध्ये विद्यार्थ्यास इयत्ता १२ वी मध्ये किमान ६० टक्के गुण आवश्यक आहेत तसेच विद्यार्थी हा वसतीगृह प्रवेशास पात्र असावा, विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा, पालकाचे उत्पन्न रु.२.५० लाख पेक्षा जास्त नसावे, विद्यार्थ्याचे कमाल वय ३० वर्षापेक्षा अधिक नसावे, विद्यार्थी हा कोणत्याही प्रकारची नोकरी किंवा व्यवसाय करत नसावा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची उपस्थिती किमान ७५ टक्के असावी आदी प्रमुख निकष/पात्रता आहे.

या योजनेकीरता पात्र विद्यार्थ्यांनी परिपूर्ण कागदपत्रांसह त्यांचे ऑफलाईन अर्ज सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ४ था मजला, दत्तवाडी, खारेगाव, कळवा, जि. ठाणे. ४००६०५ येथे सादर करावेत.

मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेसाठी ३१ ऑक्टोबरपर्यंत ऑफलाईन अर्ज करा

लाभ घेण्यासाठी इच्छुक ज्येष्ठ नागरिकांना आवाहन

अविरत वाटचाल न्यूज नेटवर्क

ठाणे : देशात सर्वधर्मियांचीही मोठी तीर्थस्थळे आहेत. जिथे पुण्यकर्म म्हणून आयुष्यात एकदा तरी जाण्याचे बहुतांश ज्येष्ठ नागरिकांचे स्वप्न असते. ही बाब विचारात घेवून सर्वसामान्य ज्येष्ठ नागरिकांना देशातील मोठ्या तीर्थस्थळांना जावून मन:शांती तसेच अध्यात्मिक पातळी गाठणे सुकर व्हावे, यासाठी महाराष्ट्र राज्यातील सर्वधर्मियांमधील ६० वर्षे व त्यावरील वय असणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांसाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची ''मुख्यमंत्री–तीर्थ दर्शन'' योजना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील शासन निर्णय क्र.ज्येष्ठना–२०२४/ प्र. क्र. १८९/सामासु, दि.१४जुलै २०२४ नुसार राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे.

या योजनेतून प्रति व्यक्ती ३००००/– रुपये खर्चाची कमाल मर्यादा असून यामध्ये प्रत्यक्ष प्रवास, भोजन, निवास इ. बाबींचा समावेश असेल. भारतातील ७३ व राज्यातील ६६ निर्धारित स्थळांपैकी एका स्थळाच्या यात्रेकरिता योजनेतून एकवेळ लाभ घेता येईल. या योजनेतून पात्र प्रवाशांची निवड ही पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरावर स्थापन करण्यात आलेल्या समितीद्वारे करण्यात येईल.

या योजनेचे ऑनलाईन पोर्टल सद्य:स्थितीत सुरु नसल्याने योजनेतून निवड होण्यासाठी इच्छुक ज्येष्ठ नागरिकांनी ३१ ऑक्टोबर २०२४ पर्यंत ऑफलाईन अर्ज करणे आवश्यक राहील. अर्ज करताना आधारकार्ड, रेशनकार्ड, अधिवासबाबत पुरावा, उत्पन्न दाखला, वैद्यकीय प्रमाणपत्र, पासपोर्ट आकाराचा फोटो, मोबाईल क्रमांक, योजनेच्या अटी पालन करणेबाबत हमीपत्र इ. कागदपत्रे आवश्यक राहतील.

योजनेचे अर्ज स्वीकारण्यासाठी पोर्टल सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत कार्यवाही सुरू आहे. इच्छुक ज्येष्ठ नागरिकांनी कागदपत्रांची पूर्तता आपल्यास्तरावर करावी व ऑफलाईन अर्ज सहायक आयुक्त, समाज कल्याण, ४ था मजला, सामाजिक न्याय भवन, दत्तवाडी, स्वामी समर्थ मठासमोर, कळवा, ठाणे – ४००६०५ येथे सादर करावे, असे आवाहन समाज कल्याण सहा. आयुक्त समाधान इंगळे यांनी केले आहे.

एसटी ९ वर्षानंतर प्रथमच नफ्याच्या महामार्गावर

अविरत वाटचाल न्यूज नेटवर्क

मुंबई : गेल्या काही वर्षांपासून आर्थिक संकटाचा सामना करणारी एसटी ९ वर्षानंतर प्रथमच नफ्याच्या महामार्गावर धावू लागली आहे. आर्थिक संकटामध्ये रूतलेल्या एसटीने आता भरारी घेतली असून महामंडळाची आर्थिक घोडदौड सुरू झाली आहे.

ऑगस्ट महिन्यात ३१ विभागांपैकी २० विभागांनी नफा कमवला आहे. या महिन्यात एसटी महामंडळाला १६ कोटी ८६ लाख ६१ हजार रुपये इतका नफा झालेला आहे. मागील काळात दोन वर्ष कोरोना महामारी आणि त्या पाठोपाठ सहा महिने कर्मचाऱ्यांचा चाललेला दीर्घकालीन संप यामुळे एस टी महामंडळ आर्थिक दृष्ट्या डबघाईला आले होते. मे २०२२ पासून एसटीची सुरळीत वाहतूक सेवा सुरू झाली.

तथापि, एसटीचा घटलेला प्रवासी पुन्हा एसटीकडे वळविणे हे मोठे आव्हान होते. यावेळी राज्य शासनाने ७५ वर्षावरील ज्येष्ठांना सर्व प्रकारच्या बसमधून मोफत प्रवास व सर्व महिलांना एसटीच्या प्रवासी तिकिटात ५० टक्के सवलत या दोन योजना सुरू केल्या, की ज्यामुळे एसटीच्या प्रवासी संख्येत भरघोस वाढ झाली. सध्या सरासरी ५४ लाख प्रवासी एसटीतून दररोज प्रवास करीत आहेत.

एसटी प्रशासनाने गेल्या वर्षभरात हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बस स्थानक अभियान, विद्यार्थ्यांना शाळेत थेट पास, प्रवासी राजा दिन, कामगार पालक दिन, श्रावणात एसटी संगे तीर्थाटन, असे अनेक अभिनव उपक्रम राबविले.

पश्चिम घाट पर्यावरण संवेदनशील क्षेत्र घोषित रत्नागिरी जिल्ह्यातील ३११ गावांचा समावेश

(पान १वरून) गणेशपूर, कादवड, कळकवणे, कामथे खुर्द, खरवते, खोपड, कोळकेवाडी, कोंड फणसवणे, कोंडमळा, कुडप, कुंभार्ली, कुटरे, मजरे (गोवळ), मंजुत्री, मोरवणे, मुंढे तर्फे चिपळूण, मुंढे तर्फे सावर्डे, नांदीवसे, ओवळी, पाथे, पेढांबे, पेढे–पर्शुराम, फरूस, पोफळी,पोफळी बुद्रक, रिक्टोली, शिरगांव, स्वयंदेव, तळवडे, तळसर, टेरव बुद्रक, तिवडी, तिवरे,तुरंबव, उभाळे अशा ४४ गांवाचा समावेश आहे.

खेड तालुका

खेड तालुक्यातील ऐनी, अंबडस, आंबवली, अष्टी मोहल्ला, आस्तान, बजरंग नगर, बेलसाई बुध्दवाडी, बेलसाई चौथाई, बिरमणी, चाटव, चिंचवडी, चोरवणे, चोरवणे उत्तेकरवाडी, दहिवली, देवघर, धामणंद, धामणंद गावठान, देवधे, दिवाण खवटी, घेरारसाळगड, घेरा पाळगड,घेरासुमारगड, घोग्रे, हुमरी, जामगे, जावळी गावठाण, कळवंणी बुद्रक, कळबंणी खुर्द,कांदोशी, कर्टल, कसबा नातू, कसाई, कवळे, कळणे, खालची हुंबरी, खोपी, खोपी तांबटवाडी, किंजळे तर्फे खेड, किंजळे तर्फे नातू, कोंडवाडी, कुंभाड, कुंबवली, कुरवळ गावठाण, मिर्ले, मोरवंडे खुर्द, नादगांव, नंदीवली, नवानगर, निवे, पाखरवाडी, पासरे बुद्रक, पासरे खुर्द, पोयनार खुर्द, प्रभुवाडी, पुरेखर्दु, साखर, साखरोली, साखरोली खुर्द, सनगर, संगलोट, सार्पिली, शिंगरी, शिरगांव, शिरगांव खुर्द, शिवखुर्द, शिवतर, तळवट जावळी, तळवट खेड, तळवट पाल, तिसंगी, तिसेखुर्द, तुळशी बुद्रक, तुळशी खुर्द, वारवली, विहाळे, वडगांव बुद्रक, वडगांव खुर्द, वाडीबीड, वाडीमालदे, वाडीजैतापुर, वाडीबेलदार, वावेचिचटवाडी, वावे जाभूळवाडी, वावे तर्फे खेड, वावे तर्फे खेड गावठाण, झागडेवाडी अशा ८५ गावांचा समावेश आहे.

लांजा तालुक्यातील आगरगांव, आरगांव, बोणखोर, वापरे, भाडे, भावंड, बोरथडे, बुध्दवाडी तर्फे वेरवली बुद्रक,चापेः, चिंचुटी, डाफळे, गुरववाडी, हचे, हर्दखळे, हसोल, इसवली, जायदे, कांगवली, कांटे,कातळगांव, खानवली, खोरगांव, खोरनिनको, कोचरी, कोंडगे, कोंडगांव, कुडेवाडी, कुंभारगांव, कुरंग, कुरचुवं माचाळ, माजळ, नामे, नियाशी, पालू, पानोरे, पाटीलगांव, प्रभानवल्ली, पुरगांव, रामगांव, रायरी,

रिंगणे, रूण, साल्पे, शिरवंयल्ली, वेरळ, वेसुले विल्वडे, वाग्रट, वाकेड अशा ५० गावांचा समावेश आहे.

राजापूर तालुका -

राजापूर तालुक्यातील आगरेवाडी, बाग काझी हुसेन, बांदीवडे, भराडे, चिखले, धामणपे, डोंगर, गोठणे दोनीवडे, हरळ, हदी, हासोळ तर्फे सौदंळ, हत्तडे, जांभवली, काझीर्डा, करक, कारीवली, केळवडे, खिंगणी, कोळंब, कोळण खाडी, कोंडदसुर, कोंडसर खुर्द, कोतापूर, कुंभावडे, म्हाळुंगे, मिळंद, मोसम, ओसीवळे, पाचल, पहिलीवाडी (ताम्हाणे), पाल्ये, पांगरी बुद्रक, पांगरी खुर्द, पन्हाळे तर्फे सौदंळ, पुरूळे, पाथर्ड पाटकरवाडी, फुपेरे, प्रिंदावन, कोंडे राजापूर (म्यु.), सौंदळ , सावडव, शेजवली, तिवरे, वाल्ये, वरची गुरववाडी, वरचीवाडी, वाळवड, वाटूळ, येडव, झर्ये अशा एकूण ५१ गांवाचा समावेश आहे.

संगमेश्वर तालुका

संगमेश्वर तालुक्यातील आगरेवाडी, आंबेत, अणदेरी, आंगवली, असावे, आसुडे, बामणोली, बेलारी बुद्रक, बेलारी खुर्द, बेलारी वाडी, भांडखंबे, भोवडे, बोंडे, चांदीवणे, चाफवली, डाखीण, देवधे देवाळे घेराप्रचीतगड, देवघर, धामणी, डिंगणी, गोळवली, गोठणे, हात्तीव, हेदली, कारंडेवाडी, कासे, कातवली, कातुर्डी कोंड, खडी कोळवण, किंजळे, किरबेट, कोंडअंबेड, कोंडभैरव, कोंडओझरे, कोंडरन, कुचांबे, कुळे, कुभांरखाणी बद्रुक, कुभांरखाणी खुर्द, कुंडी, कुरधुंडा, कुटगिरी,मळदेवाडी, मांजरे, मसरंग, मठ धामापूर, मावळंगे, मुर्शी, नायरी, निगडवाडी, निनावे, निवळी, निवदे, ओझरेबुद्रक, पांचावे, फणसावळे, पिरंदवणे, राजवली, रांगव, रातांबी, संगमेश्वर,सायली, शेववणे, शेनवडे, शिंदे आंबेरी, शिरंबे, शृगांरपुर, सोनारवाडी, तळवडे तर्फे देवरूख, तांबेडी, ताम्हणळे, थोरली धामणी तिवरे घेराप्रचितगड, तुरळ, उमरे, उफळे, विकासनगर,वाडी आधिष्टी, वाशी तर्फे संगमेश्वर अशा ८१ गांवाचा समावेश आहे.

मुख्यमंत्री योजनादूत अर्ज करण्यास १७ सप्टेंबर पर्यंत मुदतवाढ

अविरत वाटचाल न्यूज नेटवर्क

मुंबई : शासनाच्या विविध योजनांची सर्वसामान्य नागरिकांना माहिती देण्यासाठी मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम सुरु करण्यात आला आहे.

या उपक्रमात सहभागी होण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली असून आता १७ सप्टेंबर २०२४ पर्यंत नोंदणी अर्ज करता येणार आहे.

या योजनेसाठी इच्छुक उमेदवारांनी www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर अर्ज करावा, असे आवाहन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम राबविण्यात येत आहे.

प्रत्येक ग्रामपंचायत पातळीवर एक तर शहरी भागात प्रत्येक पाच हजार लोकसंख्येमागे एक अशा पद्धतीने राज्यात एकूण ५० हजार योजनादूतांची सहा महिन्यांसाठी निवड केली जाणार आहे.

या योजनादूतांना दरमहा १० हजार रूपये मानधन दिले जाणार आहे.

हे योजनादूत शासनाच्या लोककल्याणकारी योजनांबाबत नागरिकांना माहिती देतील.

या उपक्रमासाठी आतापर्यंत १ लाख ६६ हजारांहून अधिक उमेदवारांनी नोंदणी केली आहे.

गणपती उत्सवासाठी मध्य रेल्वे २२ विशेष रात्री लोकल चालवणार

(पान १वरून) आणि ठाणे येथे पहाटे ३.३० वाजता पोहोचेल.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस –कल्याण विशेष १ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथून पहाटे ३.२५ वाजता सुटेल आणि कल्याण येथे पहाटे ४.५५ वाजता पोहोचेल.

अप मेन लाइनवर (१४ ते १८ सप्टेंबर या काळात मध्यरात्री)

कल्याण–छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस विशेष २ कल्याण येथून मध्यरात्री १२.५ वाजता सुटेल आणि मध्यरात्री १.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे पोहोचेल.

ठाणे–छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस विशेष २ ठाणे येथून मध्यरात्री १ वाजता सुटेल आणि पहाटे २ वाजता छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे पोहोचेल.

ठाणे–छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस विशेष ४ ठाणे येथून पहाटे २ वाजता सुटेल आणि पहाटे ३ वाजता छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे पोहोचेल.

डाउन हार्बर मार्गावर (१६-१८ सप्टेंबर या काळात मध्यरात्री)

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस–पनवेल विशेष १ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथून मध्यरात्री १.३० वाजता सुटेल आणि पनवेल येथे पहाटे २.५० वाजता पोहोचेल.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस–पनवेल विशेष ३ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथून पहाटे २.४५ वाजता सुटेल आणि पनवेल येथे पहाटे ४.५ वाजता पोहोचेल.

अप हार्बर मार्गावर (१७ ते १८ सप्टेंबर या काळात मध्यरात्री)

पनवेल–छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस विशेष २ पनवेल येथून मध्यरात्री १वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे पहाटे २.२० वाजता पोहोचेल.

पनवेल–छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस विशेष ४ पनवेल येथून पहाटे १.४५ वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे पहाटे ३.५ वाजता पोहोचेल.

जिल्हा परिषदेचे बांधकाम विभागातील कामाचे लॉटरीपद्धतीने वाटप

(पान १वरून) यांनी मार्गदर्शन केले. यावेळी कार्यकारी अभियंता (बांधकाम) संदिप चव्हाण, उप कार्यकारी अधिकारी सुनिल बच्छाव, आरेखक संजीव यशवंत, बांधकाम विभागातील अधिकारी व कर्मचारी, ठेकेदार, सुशिक्षित बेरोजगार अभियंता मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यापूर्वी ही प्रक्रिया ऑफलाईन पद्धतीने कामाच्या चिठ्ठया काढून लॉटरी पद्धतीन राबविण्यात येत होती. कामांचे विभाजन योग्य पध्दतीने करण्यासाठी तंत्रज्ञानाच्या माध्यमातून १ कोटी रक्कमेची काम ठेकेदाराने पुर्ण केल्यानंतर पुढील काम नवीन ठेकेदारास देण्यात येणार आहे. ekamwatapthanezp.in या संकेतस्थळावर विकास काम प्राप्त करण्यासाठी ८६६ ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले होते.

पुर्वीची ऑफलाईन प्रक्रिया राबविताना कागदपत्रांचा वापर जास्त प्रमाणत होत होता तसेच जमा झालेली रक्कम चलनाद्वारे बँकेत भरावी लागत होती. आता ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणारी कामवाटप प्रक्रियेत स्टेशनरीचा खर्च मोठ्या प्रमाणात वाचणार असून निविदा रक्कमेचा भरणा हा संबधित सुशिक्षित बेरोजगार अभियंता मजूर कामगार सहकारी संस्था यांच्या बँक खात्यातून ऑनलाईन पद्धतीने जिल्हा परिषदेच्या बँक खात्यात जमा होणार आहे. तसेच ऑनलाईन सॉफ्टवेअर द्वारे विकास कामांचे वाटप झाले असून कामकाज वेगवान तंत्रज्ञान युक्त व पारदर्शक होणार आहे.

ज्येष्ठांची काळजी घेणारी ''मुख्यमंत्री वयोश्री योजना''

मन : स्वास्थ केंद्र, योगोपचार केंद्र आदीद्वारे त्यांचे ज्येष्ठ नागरिकांचे मानसिक तथा कौटुंबिक स्वास्थ्य अबाधित ठेवण्याच्या दृष्टीने त्यांना वयोमानपरत्वे भेडसावणाऱ्या आरोग्यविषयक विविध समस्यांवर मात करुन त्याचे जीवनमान सुखकर करण्याकरिता राज्यातील ६५ वर्षे वय व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांकरिता 'मुख्यमंत्री वयोश्री योजना' राबविण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे.

सन २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या ११ कोटी २४ लाख असून त्यापैकी सद्यस्थितीत ६५ वर्षे व त्यावरील अंदाजे एकूण १ कोटी ५० लाख ज्येष्ठ नागरिक आहेत. आज मोठ्या प्रमाणात ज्येष्ठ नागरिकांना विविध आजारपणाचा सामना करावा लागतो. केंद्र शासनाने सुरू केलेल्या योजनेच्या धर्तीवर दारिद्र रेषेखालील (बीपीएल) संबंधित दिव्यांग, दुर्बलताग्रस्त ज्येष्ठ नागरिकांना शारीरिक अक्षमतेनुसार सहाय्य साधने, उपकरणे पुरविण्यासाठी राज्यात 'मुख्यमंत्री वयोश्री योजना' सुरू करण्यात आली आहे.

योजनेचे स्वरुप

ज्येष्ठ नागरिकांना चष्मा, श्रवणयंत्र, ट्रायपॉड स्टिक, व्हीलचेअर, फोल्डिंग वॉकर, कमोड खुर्ची, नी– ब्रेस, लंबर बेल्ट, सर्वाइकल कॉलर आदी सहाय्यभूत साधने, उपकरणे खरेदी करता येणार आहेत. मानसिक स्वास्थ्य अबाधित ठेवण्यासाठी योगोपचार आदीचा लाभ घेता येईल.

या योजनेकरिता राज्य शासनातर्फे १०० टक्के अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात येणार असून पात्र लाभार्थ्यांना एकवेळ एकरकमी ३ हजार रुपयांच्या लाभ देण्यात येणार आहे. केंद्र शासनाच्या कार्मिक विभाग तसे राज्य शासनाद्वारे नोंदणीकृत योगोपचार केंद्र, मन:स्वास्थ केंद्र, मनशक्ती केंद्र, प्रशिक्षण केंद्राचा ज्येष्ठ नागरिकांना लाभ घेता येणार आहे.

लाभार्थ्यांच्या पात्रतेचे निकष

ज्या नागरिकांची दि.३१ डिसेंबर २०२३ अखेर वयाची ६५ वर्षे पूर्ण झाली आहेत, असे नागरिक या योजनेकरिता पात्र समजण्यात येतील.

ज्या व्यक्तींचे वय ६५ वर्षे आणि त्याहून अधिक आहे त्या व्यक्तींकडे आधारकार्ड असणे आवश्यक आहे किंवा आधारकार्डसाठी अर्ज केलेला असावा आणि आधारकार्ड नोंदणीची पावती असणे आवश्यक आहे. लाभार्थ्यांकडे आधारकार्ड नसल्यास ओळख पटविण्यासाठी इतर स्वतंत्र ओळख दस्तऐवजही ग्राह्य धरण्यात येणार येईल.

लाभार्थ्यांचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न २ लाख रुपयाच्या आत असणे आवश्यक असून याबाबत लाभार्थ्याने स्वयंघोषणापत्र सादर करावे. निवड किंवा निश्चित केलेल्या जिल्ह्यात एकूण लाभार्थ्यांच्या

संख्येपैकी ३० टक्के महिला असणार आहे. अर्जदाराने मागील ३ वर्षात स्थानिक स्वराज्य संस्था आणि सरकारद्वारे नियंत्रित सार्वजनिक उपक्रमांसहित कोणत्याही सरकारी स्रोतांकडून तेच उपकरण विनामूल्य प्राप्त केले नसल्याबाबतचे स्वयंघोषणापत्र सादर करावे लागेल. मात्र दोषपूर्ण, अकार्यक्षम उपकरणे आदीच्या बदलीला अपवाद म्हणून परवानगी दिली जाऊ शकते.

पात्र लाभार्थ्यांच्या बँकच्या खात्यात ३ हजार रुपये जमा झाल्यावर विहीत केलेली उपकरणे खरेदी केल्याचे देयक तसेच मन:स्वास्थ केंद्राद्वारे प्रशिक्षण घेतल्याचे लाभार्थ्यांचे प्रमाणपत्र ३० दिवसांच्या आत संबंधित सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांच्याकडून प्रमाणित करुन घ्यावे. संबंधित केंद्रीय सामाजिक उपक्रम संस्थेमार्फत विकसित पोर्टल्वर ३० दिवसांच्या आत अपलोड करावे.

अर्जासोबत आधारकार्ड, मतदान कार्ड, राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक, पासपोर्ट आकाराचे २ छायाचित्रे, स्वयंघोषणापत्र, शासनाने ओळखपत्र पटविण्यासाठी विहीत केलेली अन्य कागदपत्रे योजनेचे लाभ घेण्यासाठी आवश्यक असणार आहे.

योजनेची अंमलबजावणी

लाभार्थ्यांची निवड करणे, लाभार्थ्यांकडून आवश्यक कागदपत्रांची तपासणी करणे, लाभार्थ्यांचे आधार क्रमांक, बँक खाते यांची माहिती गोळा करणे आदी कामे नोडल एजन्सी, केंद्रीय सामाजिक उपक्रम संस्था यांच्या माध्यमातून आयुक्त समाजकल्याण, पुणे यांच्याद्वारे करण्यात येणार आहे.

लाभार्थ्यांची निवड, योजनेची अंमलबजावणी आणि देखरेख करण्याच्या उद्देशाने ग्रामीण भागाकरिता जिल्हाधिकारी व शहरी भागाकरिता आयुक्त, महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.

ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्य तपासणीद्वारे लाभार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे.

ही योजना वृद्धापकाळातील आरोग्यविषयक समस्या दूर करून आनंदी जीवन जगण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे.

६५ वर्षे व त्यावरील सर्व ज्येष्ठ नागरिकांना या योजनेचा लाभ घेण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ४था मजला, दत्तवाडी, स्वामी समर्थ मठासमोर, कळवा (प.), (दूरध्वनी क्रमांक ०२२–२५३४१३५९ या पत्त्यावर सादर करावा.

मनोज सुमन शिवाजी सानप
जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे

संपादकीय

कचऱ्याची जबाबदारी आपलीच

कोणताही सण उत्सव आनंदाने, उत्साहात साजरा करण्याची आपली परंपरा आहे. या सणांच्या निमित्ताने आपण काही नवीन प्रथा पद्धती सुरू करत असतो. त्यातलीच एक म्हणजे पर्यावरणपूरक सण उत्सव साजरा करण्याची पध्दत. गेले काही वर्षे निसर्गाला हानी न पोहोचवता आपला सण पारंपरिक पद्धतीने साजरा करण्याचं व्रत अनेकांकडून स्विकारलं जातं.मात्र यामध्ये जोपर्यंत शंभर टक्के यश येत नाही तोपर्यंत काही प्रमाणात कचरा मागे राहणारच आहे . हा कचरा कमी करण्यासाठी किंवा कचऱ्याचे वर्गीकरण करण्यासाठी शून्य कचरा मोहिम राबविण्याची गरज आहे. त्यासाठी प्रबोधन हे महत्वाचं आहे. त्यासोबतच इच्छाशक्ती सर्वात जास्त महत्वाची आहे. म्हणून स्वच्छता आणि कचरा वर्गीकरण यांची सुरूवात घरातूनच झाली पाहिजे.

रोजच्या वापरात आपण सकाळपासून रात्रीपर्यंत किती कचरा करतो याचा अंदाज आपल्याला हवा. हे एका दिवसात होणार नाही, पण सवय लावली तर हळूहळू अंदाज नक्की येणार. त्यातही किती प्लास्टिक वापरलं जातंय, किती वस्तू अशा वापरतोय की ज्या निसर्गात विघटन होऊच शकत याची नोंद जेव्हा प्रत्येक व्यक्ती स्वत: घेईल, तेव्हा कचरा निर्माण करण्याचं प्रमाण कमी होईल. कमीत कमी कचरा निर्माण करायचा हे आता प्रत्येकाने ठरविण्याची वेळ आहे.

यामध्ये खूप छोट्या छोट्या गोष्टींनी सुरूवात होते. दूधाची पिशवी कापताना कोपलेला छोटासा तुकडा ओल्या कचऱ्यात बऱ्याचदा टाकला जातो. पिशवी पुर्नवापर प्रक्रियेला टाकली जाते, पण हा तुकडा वेगळाच राहतो. असे तुकडे वेगळे गोळा करून ते जमवले जाणं ही सुध्दा नवीन सुरूवात होवू शकते. घरच्या घरी कचऱ्यापासून खत बनविण्याची प्रक्रियाही अनेक घरांमध्ये केली जात आहे पण त्याचं प्रमाण कमी आहे. या सर्व बाबींची सवय व्हायला हवी तेव्हा कचरा आणि स्वच्छता एकमेकांना पुरक होतील.

येत्या काही दिवसांत सण, उत्सव मोठ्या प्रमाणात साजरे होणार आहेत. या सणांमध्ये लागणारे सजावटीचं सामान पारंपरिक पद्धतीने वापरलं गेलं तर पर्यावरणाचा सांभाळ करता येईल. त्यानिमित्ताने नामशेष होत चाललेल्या वनस्पती, फुलं, पारंपरिक पदार्थ यांचं संवर्धन होईल. आपल्याकडे कोणताही उत्सव म्हटला की फाटके वाजवले जातात. कानठळ्या बसवणारे फटाके काय किंवा आवाज न करणारे फटाके मोठ्या प्रमाणात हवा प्रदूषणासाठी कारणीभूत असतात. याबाबत जनजागृती केली जाते. मात्र त्यांचा वापर कमी होताना दिसत नाही. फटाक्यांचा वापर कमी झाला तर केवळ हवेचे प्रदूषणच नव्हे तर रस्त्यावर होणारा फटाक्यांचा कचराही कमी होईल. फटाक्यांचा कचरा साफ करण्यासाठी संपूर्ण रात्रभर सफाई कामगारांना रस्ते झाडावे लागतात. ज्या सणाला आपण आपल्या कुटुंबासोबत सणाचा आनंद घेत असतो तेव्हा कामगार त्यांचं काम करत असतात हे चित्र बदलण्याची गरज आहे. फटाके वापरलेच नाहीत तर ही वेळ येणार नाही.

स्वछता ही केवळ घरात, दारातच करायची नाही तर आपल्या परिसरातही करायची आहे. घराबाहेर असताना कमीत कमी इकडे तिकडे कचरा न टाकायचं मनाशी ठरवलं तरी कचरा कमी होतो. जागोजागी असलेल्या कचरा कुंडीचा उपयोग झाला तर सफाई कामगारांना मदतच होईल.

कचरा कमी करायचा असेल तर पुनर्वापरावर भर द्यायला हवा. याची सुरूवात प्लास्टिक पिशव्यांचा वापर बंद करून कापडी पिशव्यांचा वापर सुरू करण्यापासून करायला हवा. यानिमित्ताने एक रोजगार यंत्रणाही उभी राहणार आहे. त्या यंत्रणेला हातभार लावत निसर्गाला जपण्याचा प्रयत्न करायला हरकत नाही. निसर्ग कचरा तयार करत नाही. तो माणसाकडून तयार होत असतो. आपल्याला लागणाऱ्या प्रत्येक वस्तू आपण निर्माण केल्यामुळे त्यांच्या वापरानंतर त्या सहजपणे फेकून देण्याची प्रवृत्ती तयार झाली आणि कचरा विघटनाचा प्रश्न गंभीर बनला. आता ही समस्या केवळ शहरांपुरतीच मर्यादित राहिलेली नाही तर गाव खेड्यांमध्येही कचरा मोठा प्रश्न निर्माण करत आहे. जे आपण निर्माण केलं आहे त्याचं विघटन आपणच करूयात ही भावना आणि जबाबदारी घेवून हा प्रश्न निकाली काढला गेला तरच यातून सुटका होणार आहे.

सातव्या दिवशी ३,०८६ बाप्पांना भावपूर्ण निरोप

अविरत वाटचाल न्यूज नेटवर्क

नवी मुंबई : 'नवी मुंबई महानगरपालिकेने २२ नैसर्गिक व १३७ कृत्रिम विसर्जनस्थळी केलेल्या सुसज्ज विसर्जन व्यवस्थेमध्ये सातव्या दिवशी ३०८६ श्रीगणेशमूर्तींना भाविकांनी 'पुढच्या वर्षी लवकर या' अशा गजरात भावपूर्ण निरोप दिला. विशेष म्हणजे यात ३३३ शाडूच्या मूर्तींचा समावेश होता. पीओपी ऐवजी शाडूच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करून पर्यावरणशील दृष्टीकोन जपणाऱ्या गणेशभक्तांना विशेष प्रशस्तिपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी १३७ इतक्या मोठ्या संख्येने निर्माण केलेल्या कृत्रिम विसर्जन तलावात श्रीमूर्तींचे विसर्जन करणाऱ्या ५९१ पर्यावरण जागरूक नागरिकांना कापडी पिशव्यांचे वितरण करून गौरविण्यात आले. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी केलेल्या इकोफ्रेंडली प्लास्टिकमुक्त श्रीगणेशोत्सव' साजरा करण्याच्या आवाहनास पर्यावरण जागरूक नवी मुंबईकरांनी चांगला प्रतिसाद दिला.

नागरिकांना विसर्जनस्थळी निरोपाची आरती करण्यासाठी स्वतंत्र टेबलची पुरेशा संख्येने मांडणी करण्यात आलेली होती. निर्माल्य टाकण्यासाठी ओल्या व सुक्या स्वतंत्र निर्माल्य कलशाची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच ते संकलित निर्माल्य वाहून नेण्यासाठी स्वतंत्र निर्माल्य वाहनांची व्यवस्था करण्यात आली होती. याशिवाय कचरामुक्तीच्या दिशेने आणखी पुढचे पाऊल उचलत मुख्य विसर्जनस्थळांवर 'फोर आर' च्या अनुषंगाने चार डबे ठेवून जागरूकता करण्यात आली.

नैसर्गिक विसर्जन स्थळांवर तराफ्यांची व्यवस्था होती तसेच आवश्यक विद्युत व्यवस्था आणि जनरेटर व्यवस्था करण्यात आली होती. नैसर्गिक विसर्जन स्थळापासून नजिकच्या नागरी आरोग्य केंद्रामार्फत त्याठिकाणी वैद्यकीय पथके तैनात होती व विसर्जन व्यवस्थित रितीने व्हावे याकरिता आवश्यक संख्येने स्वयंसेवक व लाईफगार्ड्स विभाग कार्यालयांमार्फत कार्यरत होते. यासोबत नमुंमपा अग्निशमन दलाचे जवानही सुरक्षेच्या दृष्टीने दक्ष होते.

बेघर नागरिकांसाठी नवी मुंबईत घणसोली येथे बेघर निवारा केंद्र

अविरत वाटचाल न्यूज नेटवर्क

नवी मुंबई: शहरातील बेघर, निराश्रित नागरिकांना निवारा मिळावा यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत १५ मार्च २०२४ पासून प्लॉट क्रमांक २४०, सेक्टर ४, घणसोली येथे बेघर निवारा केंद्र सुरु करण्यात आलेले आहे.

या बेघर निवारा केंद्राची इमारत तीन मजली असून याठिकाणी १०३ लाभार्थी राहू शकतात एवढी क्षमता आहे. तीन मजल्यांपैकी पहिला मजला पुरुषांसाठी, दुसरा मजला महिलांसाठी तसेच तिसऱ्या मजल्यावर कुटुंबांसाठी राहण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

या निवारा केंद्राव्दारे नागरी बेघरांना निवारा या घटकामध्ये रस्त्याच्या कडेला व उघड्यावर कोणत्याही प्रकारचा निवारा नसलेल्या बेघर व्यक्तींसाठी सुविधा दिली जाते. तसेच बेघरांचे वेळोवेळी समुपदेशन करण्यात येते. यामध्ये त्यांना बेघर निवारा केंद्राविषयी माहिती देऊन त्यांच्या इच्छेनुसार बेघर निवारा केंद्रात आणले जाते. जे बेघर आहेत अशा लाभार्थ्यांना निवारा केंद्रामध्ये वैद्यकीय सेवा, चहा, नाश्ता व जेवण, आंघोळीसाठी गरम पाणी, पिण्यासाठी शुद्ध पाणी, मनोरंजनाची सुविधा अशा सर्व सेवा नि:शुल्क उपलब्ध करून दिल्या जातात.

सदर बेघर निवारा केंद्र नवी मुंबई शहर महानगरपालिकेच्या वतीने आस्था सामाजिक विकास सेवा संस्थेमार्फत चालविले जात आहे.

तरी नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात रस्त्यावर बेघर व्यक्ती (वृद्ध, महिला, मुले, दिव्यांग) आढळून आल्यास त्यांची माहिती तुषार पवार यांना मोबाईल क्रमांक ९८८१६३६१६८ तसेच राहुल वाढे यांना मोबाईल क्रमांक ८६६९३९३३०६ यावर देण्यात यावी असे आवाहन नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाच्या सदस्यांकडून स्वच्छताविषयक कामाची प्रशंसा

अविरत वाटचाल न्यूज नेटवर्क

नवी मुंबई : केंद्र सरकारच्या राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य डॉ.पी.पी.वावा यांनी नुकतीच नवी मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालयास भेट देत महानगरपालिकेच्या वतीने सुरु असलेल्या स्वच्छता कामांची तसेच स्वच्छतामित्र व सफाईमित्र यांच्यासाठी महानगरपालिका करीत असलेल्या कामाची प्रशंसा केली. यापुढील काळात अधिक चांगले काम होईल असा विश्वास व्यक्त करीत त्यांनी काही मौल्यवान सूचनाही केल्या.

याप्रसंगी उपस्थित सामाजिक सल्लागार गिरेंदर नाथ व समन्वयक संदिप चरण यांचाही सन्मान करण्यात आला. सदर बैठकीस अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार व शिरीष आरदवाड आणि विभागप्रमुख व अधिकारी उपस्थित होते.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य डॉ.पी.पी.वावा यांचे स्वागत केले. यावेळी आयुक्तांनी महानगरपालिकेच्या स्वच्छताविषयक कार्याची आणि सफाई कर्मचाऱ्यांसाठी करण्यात येत असलेल्या कामाची व सोयीसुविधांची सादरीकरणाव्दारे माहिती दिली. महानगरपालिका स्वच्छताकर्मीचा उल्लेख स्वच्छतामित्र व सफाईमित्र करते, यामुळे स्वच्छताकर्मीच्या सामाजिक प्रतिष्ठेत वाढ होते याची दखल सदस्यांनी घेतली.

यावेळी राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य डॉ.पी.पी.वावा यांनी नवी मुंबई महानगरपालिकेच्या स्वच्छताविषयक विविध वाहनांची व यंत्रसामुग्रीची प्रत्यक्ष पाहणी केली व सफाईमित्रांशी थेट संवाद साधला.

इतर शहरांच्या तुलनेत नवी मुंबई महानगरपालिकेचे काम खूप पुढारलेले असून याठिकाणी स्वच्छता कामगारांच्या सुरक्षेची व आरोग्याची विशेष काळजी घेतली जात असल्याबद्दल डॉ.पी.पी.वावा यांनी समाधान व्यक्त केले.

जेष्ठ नागरिक संघाच्या वतीने विजय नाहटा यांचा नागरी सन्मान

अविरत वाटचाल न्यूज नेटवर्क

नवी मुंबई: जेष्ठ नागरिकांसाठी महामंडळ स्थापन झाल्यामुळे सानपाडा येथील जेष्ठ नागरिकांच्या वतीने सानपाडा येथील विरंगुळा केंद्रात माजी सनदी अधिकारी आणि शिवसेना शिंदेगटाचे उपनेते विजय नाहटा व अखिल भारतीय ज्येष्ठ नागरिक महासंघाचे उपाध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे यांचा सानपाडा येथील ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जेष्ठ नागरिकांना म्हातारपणाचा आधार व्हावा म्हणून महामंडळाची घोषणा केली आहे. हे महामंडळ स्थापन व्हावे म्हणून माजी सनदी अधिकारी तथा शिवसेना उपनेते विजय नाहटा व अखिल भारतीय ज्येष्ठ नागरिक महासंघाचे उपाध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे यांनी प्रयत्न केले होते. या मागणीसाठी संघटनेच्या वतीने आंदोलन आणि उपोषणही करण्यात आले होते.महाराष्ट्रातील सव्वा कोटी नागरिकांना या महा मंडळाचा लाभ होणार आहे.

जेष्ठनागरिक महामंडळाच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांसाठी आर्थिक नियोजन करणे,जेष्ठ नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणे,ज्येष्ठ नागरिकांना ताणतणावास तोंड देण्यासाठी सक्षम करणे आणि अशा अनेक अडचणीतून मार्ग काढण्यासाठी या महामंडळाची निर्मिती करण्यात आली असल्याचे विजय नाहटा यांनी सांगितले.

महापालिकेच्या पदव्युत्तर पदवी वैदयकीय महाविदयालयास परवानगी

अविरत वाटचाल न्यूज नेटवर्क

नवी मुंबई : नवी मुंबई महानगरपालिकेचे पदव्युत्तर पदवी वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्यास राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाची परवानगी प्राप्त झालेली आहे. यामुळे नागरिकांना अधिक दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करुन देणे महानगरपालिकेस शक्य होणार असून महानगरपालिकेच्या आरोग्य सेवेचे सक्षमीकरण होणार असल्याचे महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. कैलास शिंदे यांनी सांगितले आहे.

महानगरपालिकेचे पदव्युत्तर वैदयकीय महाविदयालय सुरु करण्यासाठी राज्य शासन व केंद्र शासन पातळीवर सातत्याने पाठपुरावा करण्यात येत होता. राज्य शासनामार्फत आवश्यक परवानगी प्राप्त होण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले व त्यांनी संबंधित विभागांस जलद कार्यवाहीचे निर्देश दिले होते. त्याचप्रमाणे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचेही आवश्यक परवानगी प्राप्त व्हावी यादृष्टीने सहकार्य लाभले. आ.गणेश नाईक व आ.मंदा म्हात्रे यांनीही सातत्यपूर्ण पाठपुरावा केला होता.

त्यानुसार राज्य शासनामार्फत आवश्यक परवानग्या प्राप्त झाल्यानंतर खा. नरेश म्हस्के यांनी यामध्ये विशेष पुढाकार घेत केंद्रीय आरोग्य राज्य मंत्री प्रतापराव जाधव व केंद्रीय आरोग्य विभाग यांच्याकडे परवानगी मिळण्याबाबत पत्रव्यवहार करुन व प्रत्यक्ष भेटून सातत्याने पाठपुरावा केला.

सदर मंजूरीनुसार पीजी मेडीकल सायन्स इन्स्टिटयुटमध्ये पहिल्या टप्प्यात 'मेडिसीन (३ सीट्स) ऑर्थोपॅडीक (२ सीट्स), गायनॅकोलॉजी (८ सीट्स) व पिडीयाट्रीक (४ सीट्स)' अशा ४ शाखा सुरु करण्यात येत असून लवकरच सर्जरी या शाखेलादेखील परवानगी प्राप्त होणार आहे.

मेडीकल सायन्स इन्स्टिटयुट सुरु करण्यासाठी महानगरपालिकेच्या वाशी व नेरुळ सार्वजनिक रुग्णालयात सर्व आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे डीन, प्राध्यापक, सहा. प्राध्यापक व आवश्यक कर्मचारीवर्ग उपलब्ध करून घेण्यात आलेला आहे. त्यामुळे या शैक्षणिक वर्षात लवकरच महाविद्यालय सुरू केले जाणार आहे.

या पदव्युत्तर पदवी वैद्यकीय महाविद्यालयामध्ये प्रशिक्षित एमबीबीएस डॉक्टर पुढील उच्च शिक्षण घेण्यासाठी येतील व नवी मुंबई महानगरपालिका रुग्णालयातील रुग्णांवरील उपचारांसाठी या प्रशिक्षित डॉक्टर्सचा उपयोग होईल.

याव्दारे महापालिका रूग्णालयात मेडिकल इन्टेसिव्ह केअर, पिडीयाट्रीक इन्टेसिव्ह केअर, इमर्जन्सी ॲण्ड ट्रॉमा सर्व्हिसेस अशा सुपर स्पेशालिटी सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आहे. या माध्यमातून महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाचे सक्षमीकरण होणार असून नवी मुंबईकर नागरिकांना महानगरपालिका रुग्णालयात अधिक उत्तम दर्जाच्या आरोग्य सुविधा उपलब्ध होणार आहेत.

नवी मुंबई जिल्हास्तरीय शालेय टेबल टेनिस स्पर्धेमध्ये शतकीय संघांचा उत्स्फुर्त सहभाग

अविरत वाटचाल न्यूज नेटवर्क

नवी मुंबई : नवी मुंबई महानगरपालिका जिल्हास्तरीय शालेय टेबल टेनिस क्रीडा स्पर्धेचे आयोजन क्रीडा व सांस्कृतिक विभागाच्या वतीने क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद, ठाणे यांच्या सहकार्याने करण्यात आले असून या स्पर्धा फा.ॲग्नेल स्पोर्टस सेंटर, सेक्टर १०, वाशी येथे अत्यंत उत्साहात संपन्न झाल्या. विविध शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांतून १४, १७ आणि १९ वर्षाआतील मुलांच्या गटात ६३ संघ आणि मुलींच्या गटात ३९ संघ असे एकूण १०२ संघ या स्पर्धेमध्ये सहभागी झाले होते.

या स्पर्धेत १४ वर्षांखालील मुलांच्या गटातील अंतिम सामन्यात दिल्ली पब्लिक स्कुल, नेरुळ शाळेचा संघ पोद्दार केम्ब्रिज स्कूल, नेरुळ यांच्यावर ३-१ अशा सेटने मात करीत पुढील मुंबई विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. या गटातील तिसऱ्या क्रमांकासाठीच्या सामन्यात डी. ए. व्ही. पब्लिक स्कूल, ऐरोली यांनी ३-१ अशा सेटने क्राईस्ट अकॅडमी, कोपरखैरणे संघाला पराभूत केले.

१७ वर्षांखालील मुलांच्या गटातील अंतिम सामन्यात फा.ॲग्नेल स्कूल, वाशी या संघाने ३-० अशी माध्यमिक विद्यालय, विवेकानंद संकुल, सानपाडा संघावर सरळ सेटनी मात करीत पुढील मुंबई विभागीय स्पर्धेसाठी पात्रतेची बाजी मारली. तिसऱ्या क्रमांकासाठीच्या सामन्यात ३-२ अशा सेटने जिंकत पोद्दार सी.बी.एस.ई स्कुल, नेरुळ शाळेने न्यू होरायझन पब्लिक स्कूल, ऐरोली या संघावर विजय संपादन केला.

स्पर्धेतील १९ वर्षांखालील मुलांच्या गटातील अंतिम सामन्यात फा.ॲग्नेल स्कुल, वाशीहा संघ शिरवणे ज्युनिअर कॉलेज, नेरुळ यांच्या संघावर ३-१ अशा सेटने विजय मिळवत पुढील मुंबई विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरला. या गटातील तिसऱ्या क्रमांकासाठी डी.ए.व्ही. पब्लिक स्कूल,ऐरोली यांनी रिलायन्स फाउंडेशन स्कुल, कोपरखैरणे यांच्यावर ३-२ अशा सेटने विजयश्री संपादन केली.

१४ वर्षांखालील मुलींच्या गटातील अंतिम सामन्यात अमिटी इंटरनॅशनल स्कूल, सीबीडी, बेलापूर यांनी ए.पी.जे.स्कूल, नेरुळ यांच्यावर -० अशा सेटने मात करीत पुढील मुंबई विभागीय स्पर्धेची पात्रता गाठली. रायन इंटरनॅशनल स्कूल, सानपाडा ही शाळा रिलायन्स फाऊंडेशन स्कूल, कोपरखैरणे यांच्यावर ३-१ अशा सेटने मात करीत तिसऱ्या क्रमांकाची मानकरी ठरली.

१७ वर्षांखालील मुलींच्या गटामध्ये फा.ॲग्नेल स्कूल, वाशी यांनी व्ही.पी.एम. स्कूल, ऐरोली यांच्यावर ३-० अशा सरळ सेटने सामना जिंकत पुढील मुंबई विभागीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. या गटातील तिसऱ्या क्रमांकासाठीच्या सामन्यात ए.पी.जे. स्कूल, नेरुळ हे ३-२ अशा सेटने रायन इंटरनॅशनल स्कूल, सानपाडा यावर मात करीत जिंकले.

१९ वर्षांखालील मुलींच्या गटातील अंतिम सामना ए.पी.जे. स्कूल,नेरुळ आणि दिल्ली पब्लिक स्कूल,नेरुळ यांच्यात झाला. त्यामध्ये ३-१ अशा सेटने दिल्ली पब्लिक स्कूल, नेरुळ शाळेचा संघ पुढील मुंबई विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरला. या गटातील तिसऱ्या क्रमांकाचा मानकरी डॉ.डी.वाय.पाटील इंटरनॅशनल स्कूल, नेरुळ ही शाळा रिलायन्स फाऊंडेशन स्कूल, कोपरखैरणे यांच्यावर ३-२ अशा सेटनी मात करीत ठरली.

नवी मुंबई जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत प्रत्येक वर्षागणिक मोठया संख्येने शाळांचा सहभाग वाढत असल्याने क्रीडा विभागाच्या प्रयत्नांना यश येत असल्याचे दिसून येत आहे. जिल्हास्तरीय टेबल टेनिस स्पर्धेतील प्रत्येक गटातील विजेत्या संघांना पुढील मुंबई विभागीय स्पर्धेसाठी आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी शुभेच्छा दिल्या.

अविरत वाटचाल हे साप्ताहिक वर्तमानपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक स्वप्ना सिद्धार्थ हरळकर यांनी सिद्धी सर्विसेस, प्लॉट क्रमांक ए-५४४, महापे एमआयडीसी, नवी मुंबई- ४००७०९ येथे छापून ई २/१३, अन्नपूर्णा को.ऑप.हाऊसिंग सोसायटी, सेक्टर -४८, नेरुळ, नवी मुंबई-४००७०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक - स्वप्ना सिद्धार्थ हरळकर . कार्यकारी संपादक - सिद्धार्थ रमेश हरळकर.

(अविरत वाटचाल या वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या सर्वच बातम्या अथवा लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ते लेखन संबंधित लेखकाचे वैयक्तिक मत असू शकते.(सर्व कायदेशीर मुद्दे वा प्रकरणे वाशी (नवी मुंबई) न्यायालयाच्या कक्षेत असतील.)

या वर्षीची माझ्या घरातील गणपतीची आरास !



मी दरवर्षी गणपतीच्या सजावटीमध्ये काही वेगळे मांडण्याचा प्रयत्न करीत असतो. या आधी वरळी वांद्रे सी लिंक ब्रिज, मेट्रो रेल्वे येण्याआधीच मेट्रो रेल्वे प्रकल्प, खरी वाळू वापरून गोव्याचा समुद्र किनारा, खरे पाणी वापरून गोव्यातील मांडवी नदीचा परिसर अशा गोष्टी आरास म्हणून गणपतीसमोर मांडून झाल्या. तरी जे

समाधान जुन्या परंपरा, वस्तु, वास्तु मांडण्यामध्ये मिळते ते या नवीन गोष्टीतून फारसे मिळत नाही.

म्हणूनच मग मी दरवर्षी पर्यावरण स्नेही आरास आणि जुन्या वस्तू मांडण्याचा पुन्हा पुन्हा प्रयोग करतो. ज्या अनेक वस्तू आता दुर्मीळ झाल्यामुळे लोकांना पहायलाही मिळत नाहीत, त्या गणपतीच्या सजावटीत मांडलेल्या पाहायला खूप आवडतात. तर कांही जणांना त्यामुळे पुनरूप्रत्ययाचा आनंद मिळतो.

काळया पाषाणातली मंदिरसदृष्य

वास्तु आणि त्यात अनेक जुनी उदबत्ती घरे (अगरबत्ती स्टँड) ही या वेळची संकल्पना होती. त्यानुसार एक मोठा मंडप, त्याला देवळाचा म्हणजेच दिवे ठेवायचे कोनाडे, कोनाड्यांच्या भोवती वेलबुट्टी, मोठे खांब, खुंट्या अशी रचना केली.

ही सर्व रचना फक्त लाकूड, कागद आणि पुठ्ठ्यातून साकारली होती.

गणेश मूर्ती पारंपरिक लाल मखमली कुंची घालून घरी आणली. त्याच्या शिसवी चौरंगाला पितळी घुंगुर लावलेले आहेत.

विशेष म्हणजे माझ्या संग्रहातील सुमारे २५ विविध प्रकारची, गेल्या शतकापासून वापरली गेलेली उदबत्तीची विविध घरे म्हणजेच अगरबत्ती स्टँड्स मांडले होते. यात हत्तीच्या सोंडेतील, हत्तीच्या पाठीवरील, चार हत्तींच्या पाठीवरील, एका हत्तीच्या पाठीवर माहूत व २ वानरांसह सुमारे ४० उदबत्त्यांचे घर

अशी काही घरे ही हत्ती संबंधातील होती. उदयपूरच्या विजयस्तंभाचे, नागाच्या फणीवरील फुलामध्ये असलेले, दाक्षिणेतल्या गरुडस्तंभासारखे असलेले, बुद्धिबळातील हत्ती आणि उंट यांच्यासारखी दिसणारी, लाकडी,

काचेची, चांदीची, दगडी, शंखापासून बनवलेली, बारीक तारेची अशी अनेक विविध प्रकारची उदबत्ती घरे मांडली होती.

याशिवाय ५ किंवा ११ दिव्यांची, कापराची जशी आपण आरती ओवाळतो तशी उदबत्त्यांची दुर्मीळ आरती सुद्धा मांडली होती.

नवीन कल्पनेसह पुढच्या वर्षी लवकर या, असा गणपती बाप्पाला निरोप दिला !

मकरंद करंदीकर
makarandsk@gmail.com

महारथी महाराष्ट्राचे

भाग : २४

एयर मार्शल शिरीष बबन देव

भारतीय वायू सेना - अति विशिष्ट सेवा मेडल



लेखक :दिलीप गुप्ते

१५ जून १९७९ रोजी शिरीष बबन देव नावाचा एक तरुण भारतीय वायुदलात फायटर पायलट म्हणून दाखल झाला. आणि आपल्या ३५ वर्षाच्या कारकिर्दीत अनेक वेगवेगळ्या जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडत एयर मार्शल या पदावरून निवृत्ती घेतली.

उड्डाणांमध्ये प्रथम क्रमांक आणि अपघात विरहित ३९०० तासांचा उड्डाणाचा अनुभव त्यांना होता. टॅक्टीक्स अँड एयर कॉम्बॅट डेव्हलपमेंट व फ्लाईंग इंस्ट्रक्टर स्कूल चे ते डायरेक्टींग स्टाफ होते. वायुदलातर्फे घेण्यात येणाऱ्या गबरी विमानातून स्ट्रॅफिंग करण्याच्या स्पर्धांमध्ये त्यांनी अनेक पारितोषिके मिळवली होती.

१९९८ मध्ये विंग कमांडर शिरीष बबन देव यांनी एका फायटर स्क्वाड्रन ची सूत्रे हाती घेतली. त्यांची एकमेव स्क्वाड्रन अशी होती, जिने ऑपरेशनल फ्लाईंग ट्रेनिंग तसेच इतर अनेक जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या होत्या. विंग कमांडर शिरीष त्यांच्या नेतृत्वाखाली त्यांच्या स्क्वाड्रन ने जवळपास ७०० सॉर्टी यशस्वीपणे पार पाडल्या होत्या. विंग कमांडर शिरीष बबन देव यांच्या लढाऊ वृत्ती , शस्त्रास्त्रांवरील असामान्य कौशल्यामुळे अनेक पायलटस ना प्रोत्साहन मिळत असे, तसेच त्यांनी स्क्वाड्रन च्या कुटुंबासाठी, त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी काही उपक्रम देखील चालू केले होते. अशा वेगवेगळ्या पद्धतीने ते त्यांच्या स्क्वाड्रन चे मनोबल ऊच्चस्तरावर राहण्यासाठी प्रयत्नशील असत.

एयर हेड क्वार्टर ऑपरेशन सेंटर चे डिझाईन त्यांनी केले होते आणि वरिष्ठांना ते एवढे पसंत पडले की नॅशनल तसेच कमांड हेड क्वार्टरला देखील तेच डिझाईन वापरण्यात आले. एयर डिफेन्स प्रोग्रॅमच्या चीफ ऑफ स्टाफ कमिटीचे ते सेक्रेटरी होते. पठाणकोट एयरफोर्स स्टेशन चे चीफ ऑपरेटिंग ऑफिसर असताना त्यांनी कॅम्पस एरिया नेटवर्क ची प्रणाली स्वत: तयार केली होती, जी भारतीय वायुदलातील आयटी ऑटोमेशन या तंत्रज्ञानासाठी एक महत्वाचा पॉइंट ठरली, ते देखील वायुदलाला एकही पैसा खर्च करायला न लागता.

सिग्नल युनिट चा पदभार स्वीकारल्यानांतर त्यांनी स्वत:च्या कल्पकतेतून हवामानाचे चित्र रडार वर एकाच वेळी जवळपास ३००० रडार वापरणाऱ्या युजर्स नाॅ ।ब्छम्ज वर दिसेल अशी एक प्रणाली तयार केली. तसेच त्यांनी आणखी एका टीमचे नेतृत्व केले जिने रडार चा डेटा वापरुन तो दाखवणाऱ्या प्रणालीची निर्मिती केली आणि वायुदलाचा पर्यायाने देशाचा पैसा वाचवला. अशा प्रकारच्या गालीची किमत मिलियन डॉलर्स मध्ये असते, पण एयर मार्शल शिरीष यांच्या प्रगल्भ बुद्धिमत्तेने अशी प्रणाली स्वत: तयार केली. या प्रणालीचा वापर आणखी प्रगत केला गेला ज्यामुळे तात्पुरत्या काळासाठी मोठ्या संख्येने लागणाऱ्या फायटर कंट्रोलर ची आणि त्या अनुषांगाने होणाऱ्या खर्चाची चचत झाली.

काही जुनी साधने वापरून त्यांनी परदेशी बनावटीच्या ५ ते ६ करोड रुपये किमतीच्या स्मोक जनरेटर्सच्या तोडीचे स्मोक जनरेटर्स अत्यंत कमी खर्चात बनवले होते. जीपीएस प्रणालीचा वापर करून शत्रूच्या मिसाईल्स ना जॅम करण्याचे तंत्र देखील भारतीय वायुदलासाठी विकसित केले होते.

आदी विकसित केलेल्या प्रणाली मुळे सुखोई विमानांच्या रडार प्रणाली मध्ये आणि त्याच्या मेंटेनन्स शेड्यूल मध्ये कमालीची सुधारणा झाली होती. त्यांनी विकसित केलेल्या प्रणाली मध्ये रडार वापरण्यासाठी लागणाऱ्या अनेक मानकांमध्ये गरजेनुसार बदल करण्याची सुविधा होती.

एयर मार्शल शिरीष बबन देव यांनी भारतीय वायुदलाला दिलेल्या सैनिकी तसेच तंत्रज्ञानाच्या योगदानाची दखल घेत त्यांना अतिविशिष्ट सेवा मेडल देऊन सम्मानित करण्यात आले होते. अशा या पराक्रमी आणि तंत्रज्ञानामध्ये देखील पारंगत असणाऱ्या वीराला आमचा मानाचा मुजरा.

(सौजन्य : दिलीप गुप्ते यांच्या महारथी पुस्तकातून साभार. ठाणे

‘माय भारत’ पोर्टलवर तरुण-तरुणींनी नोंदणी करावी

ठाणे जिल्हा क्रीडा विभागाचे आवाहन

अविरत वाटचाल न्यूज नेटवर्क

ठाणे : भारत देश युवांचा देश म्हणून ओळखला जात असून राष्ट्र निर्माणाच्या शाश्वत विकासाच्या मुख्य प्रवाहात युवांचे मोठे योगदान आहे. सामाजिक विकासाच्या प्रभावी माध्यमांची ओळख करून राष्ट्रीय व सामाजिक विकासाच्या प्रवाहात युवा शक्तीचा सहभाग असून तो वाढविणे आवश्यक आहे. यासाठी युवक कल्याण व क्रीडा विभाग यांनी १८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२४ या दरम्यान युवांच्या सहभागाने विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के यांनी दिली आहे.

''माय भारत'' पोर्टलवर विविध युवा उपक्रम नोंदणी करणे, सेवाकार्य, स्वच्छता हा नवीन संकल्प–स्वच्छता पंधरवडा असे विविध उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. युवांचा राष्ट्र निर्माण कार्यात सहभाग वाढविणे, विकसित भारत करण्यामध्ये युवांनी योगदान देणे, याबाबत या पोर्टलवर युवांनी नोंदणी करणे आवश्यक आहे. यासाठी https://mybharat.gov.in या संकेतस्थळावर जिल्ह्यातील शाळा, कॉलेज व महाविद्यालय तसेच राष्ट्रीय छात्र सेना, स्काऊट व गाईड इ. विद्यार्थी व प्रशिक्षणार्थी यांनी नोंदणी करावयाची आहे.

यामध्ये युवांनी केलेल्या विविध कार्याची माहिती संकलित होते. त्यांनी विविध वर्षामध्ये तसेच कार्यक्रमामध्ये घेतलेल्या सहभागाबाबत तपशिल एकत्रित होतो.

यामुळे युवांनी केलेल्या कार्याची वैयक्तिक माहिती पोर्टलवर उपलब्ध होते. ठाणे जिल्ह्यातील विद्यापीठ व महाविद्यालय स्तरावरील युवा व राष्ट्रीय सेवा योजनेचे छात्र यांनी नोंदणी ''माय भारत'' पोर्टल वर करण्यात यावी.

१५ ते २९ वयोगटातील युवा विचारात घेता शाळा , कनिष्ठ महाविद्यालय व महाविद्यालय यांनी नोंदणी करावी. उर्वरित माहिती संकेतस्थळावर उपलब्ध असून अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, कोर्ट नाका, ठाणे दूरध्वनी - ०२२–२५३६८७५५ येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के यांनी केले आहे.

यशस्वी निवेदनाचे पाठ्यपुस्तक म्हणजे महेंद्र कोंडे यांचे'बोलता बोलता'

साहित्यिक प्रा. प्रवीण दवणे यांचे गौरवोद्गार

अविरत वाटचाल न्यूज नेटवर्क

ठाणे : निवेदन, सूत्रसंचालन क्षेत्रातील वैविध्य टिपणारे 'बोलता बोलता'हे महेंद्र कोंडे यांचे पुस्तक जणू यशस्वी निवेदनाचे पाठ्यपुस्तक असून हे पुस्तक वाचून, अभ्यासून आणखी आठ–दहा वर्षांनी चांगल्या निवेदकांची फळी महाराष्ट्रात निर्माण झाली तर आश्चर्य वाटायला नको अशा शब्दात सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. प्रवीण दवणे यांनी या पुस्तकाचे महत्व सांगत शुभेच्छा दिल्या.

व्यास पब्लिकेशन हाऊस प्रकाशित बोल्ता बोलता या निवेदक महेंद्र कोंडे लिखित पुस्तकाचे प्रकाशन सुप्रसिद्ध साहित्यिक, कवी, गीतकार प्रा.प्रवीण दवणे यांच्या शुभहस्ते ठाणे येथे मोजक्या साहित्य रसिकांसह अतिशय आत्मिय वातावरणात संपन्न झाले.

याप्रसंगी प्रज्ञा दवणे, लेखक – निवेदक महेंद्र कोंडे, व्यास क्रिएशन्सचे संचालक निलेश गायकवाड, व्यास पब्लिकेशन हाऊसच्या प्रकाशिका वैशाली गायकवाड, साहित्यिक विनोद पितळे, निवेदिका वेदश्री दवणे उपस्थित होते.

वाद्यवृंदांचे बैठकी निवेदन, उभ्याने निवेदन, विविध स्वरूपाच्या कार्यक्रमांचे सूत्रसंचालन, आकाशवाणी, दूरदर्शन, एफ एम वाहिन्या, ऑनलाइन कार्यक्रम यांचे निवेदन अशा नानाविध क्षेत्रांना स्पर्श करणाऱ्या या पुस्तकामधील सगळी प्रकरणे ओघवत्या निवेदनासारखी असून केवळ निवेदन, सूत्रसंचालनच नाही तर व्यासपीठावर कोणत्याही प्रकारची शब्द मुशाफिरी करू इच्छिणाऱ्यांसाठी हे पुस्तक अत्यंत उपयोगी असल्याचे प्रवीण दवणे म्हणाले.

व्यास पब्लिकेशन हाऊस ही केवळ दिखाऊ आणि विकाऊ पुस्तके प्रकाशित करणारी संस्था नसून पुस्तकांतून विविधांगी मूल्य शिक्षण देणारी संस्था असल्याचे सांगत प्रवीण दवणे यांनी बोलता बोलता हे वेगळ्या आशयसूत्राचे पुस्तक प्रकाशित केल्याबद्दल त्यांचे विशेष कौतुक केले. बोलू इच्छिणाऱ्या प्रत्येकापर्यत त्यातही विद्यार्थ्यांप्रमाणेच विशेषत्वाने सर्व शिक्षक, प्राध्यापकांपर्यंत हे अत्यंत उपयुक्त पुस्तक पोहोचले पाहिजे असे त्यांनी सांगितले.

विविध ठिकाणच्या कार्यक्रमांतील सूत्रसंचालकांच्या अनेक गमतीजमतीही त्यांनी सांगितल्या. सूत्रसंचालक हे वक्त्यांना 'भाषण आवरते घ्या' म्हणून चिठ्ठ्या देतात. मात्र काही सूत्रसंचालक इतके बोलतात की त्यांना चिठ्ठी कोण देणार ? असा प्रश्न पडतो. 'हे पुस्तक म्हणजे निवेदक, सूत्रसंचालकांना दिलेली चिठ्ठी आहे' अशी मिश्किल टिप्पणीही प्रवीण दवणे यांनी केली.

पं. हृदयनाथ मंगेशकर, अरुण दाते व अनेक नामांकित गायकांच्या कार्यक्रमांचे निवेदन केले असल्याने या लेखनाशी माझे सूर त्वरेने जुळले असे सांगत प्रवीण दवणे यांनी त्या निवेदनाच्या काळातील आठवणींचा खजिना खुला केला. गानसम्राज्ञी आशा भोसले यांनी मला केवळ गोड आवाजाचा निवेदक नको तर मजकुराचा निवेदक पाहिजे असे म्हणत प्रवीण दवणे यांनीच त्यांची मुलाखत घ्यावी असा धरलेला आग्रह सांगताना उत्स्फुर्तता हा निवेदकाचा सर्वात मोठा गुण असून त्यासाठी निवेदक पाठांतरापेक्षा सर्जनशील हवा असे मत मांडले.

ज्ञानसाधना महाविद्यालयात प्रवीण दवणेसर वर्गात बोलू लागले की प्राणांचे कान करून ऐकण्याच्या संस्कारातूनच सूत्रसंचालन, निवेदनाची बीजे खोलवर रुजली असावीत असे सांगत निवेदक, लेखक महेंद्र कोंडे यांनी प्रवीण दवणसरांचे अभ्यासपूर्ण प्रस्तावनारुपी शब्दाशीर्वाद या पुस्तकाला लाभणे हा भाग्ययोग असल्याचे म्हटले.

वर्तमानपत्रातील सदरात पहिला लेख छापून आला त्याच दिवशी याचे आपण पुस्तक करूया हा शब्द खरा करणारे बालमित्र, व्यास क्रिएशन्सचे निलेश गायकवाड व त्यांच्या पत्नी व्यास पब्लिकेशन हाऊसच्या प्रकाशिका वैशाली गायकवाड यांचे त्यांनी विशेष आभार मानले.

याप्रसंगी निलेश गायकवाड, वैशाली गायकवाड व विनोद पितळे यांनी शब्द शुभेच्छा दिल्या.

निवेदिका वेदश्री दवणे यांनी या कौटुंबिक स्वरूपातील पुस्तक प्रकाशन सोहळ्याचे ओघवते सूत्रसंचालन केले.

रत्नागिरीमधील ८ महाविद्यालयांमध्ये आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र

प्रधानमंत्री नरेंद मोदी यांच्या हस्ते २० सप्टेंबर रोजी ऑनलाईन उद्घाटन

अविरत वाटचाल न्यूज नेटवर्क

रत्नागिरी : कौशल्य विकास या संकल्पनेचा अधिकाधिक लाभ राज्यातील युवक युवतींना व्हावा, या दृष्टीकोनातून राज्यामधील नामांकित महाविद्यालयांमध्ये कौशल्य विकास केंद्र स्थापन करुन महाविद्यालयीन युवक युवतींना रोजगारक्षम बनविण्याच्या दृष्टीने प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान योजनेच्या धर्तीवर राज्यातील नामांकित महाविद्यालयांमध्ये आचार्य चाणक्य कौशल्य केंद्र ची स्थापना करण्यात येत आहे. जिल्ह्यातील ८ महाविद्यालयांमध्ये सुरु करण्यात येणाऱ्या या केंद्रांचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याहस्ते २० सप्टेंबर रोजी ऑनलाईन उद्घाटन होणार आहे. या केंद्रांमधून मोफत प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

लांजा येथील आर्टस, कॉमर्स सायन्स कॉलेज आणि कल्पना कॉलेज ऑफ हॉटेल मॅनेजमेंट, सावर्डे येथील सह्याद्री पॉलिटेक्नीकल कॉलेज, खेडमधील आय.सी.एस. कॉलेज ऑफ ऑर्ट, कॉमर्स अँण्ड सायन्स, चिपळूणमधील शरद पवार इन्स्टिट्युट ऑफ अग्रीकल्चरल सायन्स, गुरुकुल कॉलेज आणि संजीवनी नर्सिंग कॉलेज अशा ८ महाविद्यालयांची जिल्ह्यातून निवड करण्यात आली आहे. आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र योजनेचे उद्घाटन प्रधानमंत्र्यांच्या हस्ते २० सप्टेंबरला व्हर्च्युअल/ऑनलाईन पध्दतीने करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. प्रत्येक केंद्रामध्ये आवश्यक बाबींची पुर्तता करावी. महाविद्यालय कौशल्य विकास केंद्र प्रशिक्षण प्रदाता यांच्यासोबत समन्वय साधून हा उद्घाटन कार्यक्रम यशस्वी होईल, या अनुषंगाने कार्यवाही करण्याची सूचनाही दिली आहे.

महाविद्यालयांमध्ये आचार्य चाणक्य कौशल्य विकास प्रशिक्षण मोफत देण्यात येणार असून, त्यासाठी जास्तीत जास्त उमेदवारांनी नोंदणी करुन योजनेचा लाभ घ्यावा तसेच २० सप्टेंबर रोजी प्रधानमंत्री नरेंद मोदी यांच्या उपस्थित होणाऱ्या कार्यक्रमास त्या त्या महाविद्यालयांच्या ठिकाणी जास्तीत जास्त उमेदवारांनी राहून उद्घाटन सोहळा पार पाडावा, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे.

पर्यावरण संवर्धनासाठीचा उत्कृष्ठ पुरस्कार ठाणे स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशनला

अविरत वाटचाल न्यूज नेटवर्क

ठाणे : पंचतत्वाचे संवर्धन ,सरंक्षण व जतन करून शाश्वत विकास साधण्यासाठी राज्य शासनाद्वारे सुरु असलेल्या माझी वसुंधरा अभियानाअंतर्गत ठाणे महानगरपालिकेच्या वतीने आयोजित पर्यावरण संवर्धन कृती स्पर्धा २०२४ करिता उत्कृष्ट कामगिरी केल्याबाबत ठाणे स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशनला प्रथम पुरस्काराने सन्मानित केले.

ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांच्या हस्ते विविध मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार संस्थेचे उपाध्यक्ष भावेश मारू, खजिनदार नोव्होनील गुहा , कार्यकारी सचिव एकनाथ सोनवणे व आरती राय यांनी स्वीकारला.

चारोळी

गुणधर्म तिचा फसविण्याचा
दु:ख देऊन जाण्याचा
गुणधर्म माझा हसविण्याचा
सुख देऊन जाण्याचा....

....पी.के.

अविरत वाटचाल
aviratvaatchal.com
@aviratvaatchalnews
aviratvaatchal
aviratvaatchal
aviratvaatchalnews@gmail.com
न्यूज कव्हरेज,बातम्या,जाहिरात प्रसिद्ध करणे,
मिडिया पार्टनर म्हणून सहभाग, डी.टी.पी.साठी संपर्क साधा. 9892438557
YOUTUBE COVERAGE | DIGITAL NEWS WEBSITE | NEWS PAPER
VIDEO EDITING | SPECIAL MAGAZINE | E-PAPER
ENTIRE D.T.P WORK | IMAGE BUILDING | PUBLIC RELATION